ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# वृद्धांच्या कुटुंब विषयक समस्या –एक समाजशास्त्रीय अध्ययन

**प्रा.डॉ. ज्ञानोबा विठ्ठलराव पडोळे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय, उमरगा
ता. उमरगा जि. उस्मानाबाद (महाराष्ट्र)

★★★

**प्रास्ताविक** – कुटुंब संस्थेच्या विघटनातून वष्द्धाची समस्या निर्माण झाली संयुक्त कुटुंब आणि विभक्त कुटुंब हे सदस्य संख्या वर आधारित कुटुंबाचे प्रकार आहेत. संयुक्त कुटुंबात एकाहून अधिक पिण्याचे सदस्य एकत्र राहत असतात. सामायिक निवासस्थान सामायिक भोजन देव आदी देव कार्यक्रम संपत्ती पूजा विधी या बाबी संयुक्त कुटुंबात महत्त्वाचे असतात प्राचीन समाज व्यवस्था ही बलुतेदारी वर अवलंबून होती तर अर्थव्यवस्थाही शेतीवर अवलंबून होती कुटुंबात वृद्ध व्यक्तीला मानाचे स्थान होते त्यांच्या विचाराला घरात किंमत होती वृद्ध व्यक्तीला कुटुंबात सांभाळले जात होते जोपर्यंत त्यांचे हात–पाय चालत होते तोपर्यंत त्या व्यक्तीचाच कुटुंबात सल्ला घेत असत. परंतु आज विसाव्या शतकात औद्योगीकरण शहरीकरण आणि आधुनिकीकरण यामुळे संयुक्त कुटुंबामध्ये संरक्षणात्मक आणि कार्यात्मक बदल झाले भारतात ६५ वर्षा वरील वर्धा चे प्रमाण 4 टक्के आहे आणि ते सतत वाढणार आहे तर अमेरिका स्वीडन इत्यादी अति प्रगत देशांमध्ये वृद्धांची संख्या बारा टक्के आहे वयोवृद्ध व्यक्तींना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते सर्वाधिक तरुणांची संख्या आज भारतामध्ये आहे परंतु काही दिवसानंतर भारत हा सर्वाधिक वृद्ध असणारा देश ठरणार आहे मानवाच्या जीवनात चार भाग पाडता येतात बालपण तारुण्य प्रौढत्व वरिधावस्था त्यातील वृद्धावस्था हा माणसाच्या आयुश्याचा साधारण ६५ व्या वर्षापासून मृत्यूपर्यंतचा कालखंड असतो वृद्धावस्थेत लोकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते शरीरातील अनेक अवयव कमजोर झालेली असतात त्याचबरोबर कुटुंबातील अनेक व्यक्तीची बोलणी खावी लागतात. इ.स.२०५० पर्यंत देशातील वृद्धांची संख्या २५ टक्के होण्याची शक्यता आहे भारतातील अनेक समस्यांपैकी आपण वृद्धांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास करणार आहोत वृद्धाच्या समस्याचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र शास्त्र उदयास आली आहे यास वृद्धाचे शास्त्र असे म्हणतात

### वृद्धांची व्याख्या

१) एलिझाबेथ हरलॉक – वृद्धावस्था हा मानवी जीवनातील शेवटचा चरण आहे

**२) ऑक्सफर्ड डिक्शनरी**– वृद्ध म्हणजे सर्वसाधारणपणे साठ वर्षे पूर्ण केलेली व्यक्ती होय

३) हेन्ड्री आणि क्युमिंग– जीवनातील उपयोगी व अभिलाशा असणाऱ्या आरंभीच्या अवस्थेपासून दूर जाण्याच्या प्रक्रियेला वृद्धावस्था असे म्हणतात

### संशोधनाचा उद्देश

१) वृद्धांच्या कौटुंबिक समस्यांचा अभ्यास करणे हा संशोधनाचा उद्देष आहे

२) वृद्धांच्या समस्या मागील कारणांचा आढावा घेणे

३) वृद्धाच्या समस्या चा अभ्यास करणे

४) वष्द्धांच्या समस्या वरील उपाय योजनांचा अभ्यास

### १ संशोधनाची गृहितके–

१) वृद्धांचा कुटुंबातील दर्जा कमी झालेला आहे

२) वृद्धांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे

३) बदलत्या परिस्थितीषी वृद्धांना समायोजन साधता न आल्याने वष्द्धांचा प्रष्न गंभीर बनला आहे

४) अपवादात्मक परिस्थितीत वष्द्धाश्रम ही आधार अवस्था आवष्यक आहे

**संशोधन पद्धती** – प्रस्तुत षोध निबंध लिहिण्यासाठी द्वितीय स्त्रोतांचा आधार घेतला आहे यामध्ये ग्रंथ संपादित ग्रंथ वर्तमानपत्रे इत्यादींचा आधार घेतला आहे

**वृद्धांच्या समस्या निर्मितीची कारणे** – वृद्धत्व ही नैसर्गिक घटना आहे जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला या अवस्थेतून जावेच लागते. त्याच बरोबर औद्योगीकरण भारतीय जीवन मुल्यावर पाचषे त्यांचा प्रभाव चंगळवाद संमिश्र समाज पद्धती यात वृद्धाला दुर्लक्षित केले. यातूनच वष्द्धांच्या समस्या निर्माण झाल्या. आणि सध्याच्या समाज व्यवस्थेच्या बदलत्या परिस्थितीनुसार वृद्धांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे भारतात एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ 75 टक्के लोक वृद्ध आहेत अशा वृद्धांच्या समस्या मागील पुढील कारणे पाहता येतील

**१) कुटुंबाचे विघटन** – भारतीय कुटुंबाच्या समस्यांना जबाबदार असलेला घटक म्हणून भारतातील बदललेल्या कुटुंबव्यवस्थेचा

नामोल्लेख करावा लागतो ारतीय समाजातील सर्व वृद्धांचा कुटुंबा महत्त्वाचा आधार होता परंतु पाश्चिमात्य राज्यकर्ते पाश्चात्त्य संपर्क त्यांनी येथे चालू केली कारखानदारी त्यातून वेगाने वाढलेले शहरीकरण यामुळे येथील कुटुंब पद्धती कुटुंबरचना कुटुंबाचे कार्य यामध्ये आमूलाग्र बदल झाला त्यामुळे व्यक्तीच्या वृद्धांचे अनेक प्रश्न निर्माण झाली म्हणून कुटुंबाचे विघटन हा एक प्रथाच या समस्येला कारण ठरलेला आहे

**२) ग्रामीण भागाचे बदलते स्वरूप–** पारंपारिक भारतीय समाजात अमृता पद्धती असल्यामुळे व्यवसायिक शिक्षण कुटुंबातच मिळत असे यामुळे वृद्धांच्या अनुभवाचा व्यावसायिक कसबा चा लाभ पुढील पिढीला होत असे शेती उद्योग याबाबतीत वर्धा कडून सल्ला घेतला जाईल पण आज आधुनिकीकरण औद्योगिकरणामुळे नवीन तंत्रज्ञान आले. त्यातून उत्पादन वाढले त्यामुळे वृद्धांच्या सल्ल्याला ज्ञानाला नवीन पुढे दुय्यम मानू लागली यातूनच दोन पिढ्यांमध्ये संघर्ष निर्माण होऊन वृद्धांचे प्रश्न निर्माण होऊ लागले

**३) व्यक्तिवादी वृत्तीची जोपासना –** आज भौतिक सुखाच्या कल्पनांच्या विस्तार झाल्यामुळे व्यक्तिवादी विचारांची जोपासना समाजात मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे आणि यादीत उत्पन्न उच्च सामाजिक दर्जा प्राप्त करण्याची अभिलाशा हिताला प्राधान्य यातून कुटुंबातील व्यक्ती व्यस्त झाले आहेत नोकरी व्यवसाय लघु उद्योग कुटिरोद्योग कौशल्य विविध स्पर्धात यशस्वी होण्यासाठी रस्सीखेच निर्माण झाली आहे त्यामुळे कुटुंबातील व्यक्तीचा सांभाळ करणे त्यांच्यासाठी वेळ देणे त्यांची काळजी घेणे कठीण झाली आहे यातूनच वृद्धांचा प्रश्न गंभीर बनला आहे

**४) वृद्धत्वाकडे पाहण्याचा दृटिकोन –** वृद्ध माणसाची शक्ती क्षीण होते. डोळ्यांना दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही, लक्षात राहत नाही, केस पिकतात, गळतात, त्वचेला सुरकुत्या पडतात इत्यादींमुळे वृद्ध व्यक्तींना कुटुंबातील व समाजातील व्यक्तींना समजून घेणे आवश्यक आहे. वृद्धांमध्ये हट्टीपणा, आग्रहत्मक भूमिका, आततायी स्वभाव याकडे कल चुकतो, यामुळे वृद्धाचे व नवीन पिढीचे विचार जुळत नाहीत. मने व मते यातील दरी रुंदावत जाते, संबंध पितृत्वाचे, सहानुभूतीचे राहण्याऐवजी तनाव पूर्ण होतात. यातून वृद्धाच्या समस्येत भर पडत जाते.

**५) वृद्धांच्या कौटुंबिक समस्या –** आज ग्रामीण व नागरी भागातील प्रत्येक मध्यमवर्गीय आणि निम्न वर्गीय कुटुंबाला आर्थिक समस्या जाणवते ह्यासाठी व्यक्ती व्यक्तिवादी दृष्टिकोनातून वर्तन करत आहे. मी व माझी बायको, मुले या शिवाय कुटुंबातील इतर व्यक्तीकडे लक्ष दिले जात नाही. येथूनच कुटुंबिक समस्यांना सुरुवात होते.

व्यवसाय, नोकरी, शेती करणाऱ्या नववधूना समाजातील बदलत्या वातावरणानुसार आपल्या पती व मुलाशिवाय इतरांची अडचण निर्माण होते येथेच कुटुंब बघण्यास सुरुवात होते. अशा वेळीच वृद्ध माता–पित्यांना शारीरिक, कौटुंबिक, मानसिक धक्का बसतो. एकाच घरात वेगळी चूल, वेगळा स्वयंपाक, वेगळी खोली जे काही संपूर्ण आयुश्य जगलं नाही असे जीवन जगण्याची वेळ आल्यामुळे मानसिक खच्चीकरण होत आहे.

कालपर्यंत अंगा खात्यांवर खेळणारी नातवंड आज आईवडिलांच्या सांगण्यामुळे दुरावली जात आहेत, सकाळ–संध्याकाळ विचारपूस करणाऱ्या व मुलगा–सून आता आठवड्यानंतर दिसू लागतील तीसुद्धा धुसफूस करीतच, कोठे जाव कसं जगावं कोठे बाहेर जायचं तर जवळ पैसा नाही, पैसा मागितला तर तो स्वखुशीने नमिता वैतागल्या सारखा फेकला जातो. मनात कुढत कुढत किती दिवस काढायचे यापेक्षा मरण आलेलं वर या मनोवृत्तीतून वृद्ध व्यक्ती जगत आहेत. जेवताना समाजातील इतर घटकांशी जुळवून घेणे जमते त्यावर त्यांना फारशी समस्या जाणवत नाही.

कुटुंबात वृद्धांना मानसन्मान न देणे.' कुटुंबातील व्यक्तीला आपण नकोसे झालो आहोत अशी वृद्धाची मानसिकता. विविध नाते संबंधित असणारे मतभेद. मालमत्तेची वाटणी न झाल्यामुळे. वृद्धाची सत्ता, वर्चस्व,मुलांना नको वाटणी इत्यादी कारणांमुळे कुटुंबात सत्तासंघर्ष निर्माण होतो. बुद्धाचे पारंपारिक विचार नवीन पिढीतील लोकांना पटल्यामुळे दोघात सतत मतभेद होऊन कौटुंबिक समस्या निर्माण होते.

**उपाय योजना –**

१) स्वातंत्र्यपूर्व कालखंडात इ.स. 1940 मध्ये बेंगलोर येथे जीम तिपमदक पद needs society ही संस्था स्थापन करून वृद्धाची वृद्धाश्रमात द्वारे सेवा करण्याचा उद्देश समोर ठेवण्यात आला.

२) स्वातंत्र्योत्तर कालखंडात ई.स.1956 हिंदू दत्तक विधान कायद्यानुसार प्रत्येक व्यक्तीवर स्वतःच्या वृद्ध आई–वडिलांची काळजी घेण्याचे बंधनकारक करण्यात आले.

३) महाराष्ट्रात शासनाने 65 वर्षावरील निराधार व्यक्तींना निवृत्तिवेतन मिळण्याची व्यवस्था केली.

४) भारत सरकारने संजय गांधी निराधार योजने निराधारांना आर्थिक लाभ मिळवून देण्यात आला.

५) महाराष्ट्र सरकारने वृद्धांसाठी प्रवासभाड्यात सवलत देण्याची योजना एस.टी महामंडळाकडून राबवली.

६) वृद्धाश्रमांची उभारणी अनेक सामाजिक संस्था द्वारे व केंद्रीय समाज कल्याण बोर्ड कडून करण्यात आली.

७) वृद्धांसाठी दैनंदिन केंद्र स्थापन करणे यात मनोरंजन, खेळ,वाचनालय, वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे यात वृद्ध व्यक्ती दिवसभराचा कार्यक्रम आठवण रात्री आपल्या कुटुंबात परत जातील.

८) वृद्धांसाठी विविध बचत गट, वृद्धापकाळात निवृत्तीवेतन, तारुण्यातच सक्तीचे आर्थिक नियोजन करणे.

९) आधुनिक काळात वृद्धाश्रमाची कल्पना मान्य झाली आहे पुण्यामध्ये 885 मध्ये डेव्हिड ससून वृद्धाश्रम विदर्भातील नागपूर येथे मातृसेवा संघ द्वारे 1961 मधील पंचवटी वृद्धाश्रम.

**निष्कर्ष –**

१) विभक्त कुटुंब पद्धतीच्या व्यक्तिवादी दृष्टिकोनामुळे वृद्धांच्या कौटुंबिक समस्या निर्माण झालेली आहेत.

२) कुटुंबातील समाजातील व्यक्तींनी वृद्धांना समजून घेतल्यास व वृद्धांनी ही नवीन पिढी यांचे विचार जुळवून घेतल्यास वृद्धांच्या समस्या कमी होण्यास मदत होईल.

३) समाजातील सर्व वृद्धांना कौटुंबिक मानसिक, भावनिक, आधार मिळाल्यास वृद्धांचे प्रष्न सुलभतेने सुटतील.

४) पर्यायी आधारे व्यवस्थेमुळे दोन पिढीतील अंतर कमी होण्यास मदत होऊन संवाद सकारात्मक दिशेने होतील त्यातून वृद्धत्वाच्या प्रश्न निर्माण होणार नाहीत.

५) वृद्धत्व ही नैसर्गिक घटना आहे प्रत्येक व्यक्तीला या वस्तीतून जावेच लागते याची जाणीव निर्माण करणे गरजेचे वाटते.

**समारोप** – जर वष्द्धांना सुद्धा समजून घेतले आणि वृद्धांचा मान–सन्मान आदर सत्कार केला तर ते त्यांच्या समस्या विसरून जाऊन समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये सामील होतील आणि आनंदी जीवन जगतील त्यासाठी वरील उपाय योजनांचा सकारात्मक विचार व्हायला हवा.

***संदर्भसूची –***

*१) समाजशास्त्रातील मूलभूत संकल्पना सर्जेराव साळुंखे*

*२) भारतीय समाज व्यवस्थेतील वृद्धाश्रम डॉ स्मिता अवचार*

*३) वृद्धांच्या समस्या चिंता आणि चिंतन डॉ दिलीप खैरनार*

*४) भारतीय समाज आव्हाने आणि समस्या रू रा.ज लोटे*

*५) संजय गांधी निराधार निराधार योजना कक्ष– सांगली*

*६) जेष्ठ नागरिक दिन वर्तमानपत्रे 20 ऑगस्ट 2018*

*७) सिंहासन –दिवाळी विषेशांक– 2018*

*८) भारतीय समाज प्रष्न आणि समस्या रू आर. बी. मेश्राम*

*९) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या डॉ. सुधा काळदाते*

*१०) भारतातील सामाजिक समस्या प्रा. पी. के कुलकर्णी*